भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०४/२०१८

**१) भांडण करून तोंडावर बुक्या मारून दात पाडुन पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंदः—**

दिंनाक ०८/०४/२०१८ चे २०.०० वा ते दि.०९/०४/२०१८ चे ०६.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याची भज्याची दुकाण उघडण्यास जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीस थांबवुन पुर्वी झालेल्या भांडणा वरून पुन्हा भांडण करून फिर्यादीचे तोंडा— तोंडावर बुक्या मारून खालचे दात पाडुन दुखापत करून शिवीगाळ केली व पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी धनीराम शामराव कावळे वय ५७ वर्ष रा. गोपेवाडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२५,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) हयगयीने, भरधाव वेगाने ट्रक चालवुन विदयुत सिमेंट खांबाला धडक मारून तार व खांब तुटुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद नोंदः—**

दिंनाक ०९/०४/२०१८ चे २१.०० वा. ते २१.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगाने दारू पिवुन दारूचे नशेत चालवुन विदयुत सिमेंट खाबांला धडक मारून तार, खांब तुटल्याने नुकसान केले व ट्रक न थांबवुन पळुन गेल्याने लोकांच्या मदतीने ट्रक पकडला अशा फिर्यादी नत्थु किसन वडे वय ५८ वर्ष रा. केशव नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९ भादवी. सहकलम १८४,१८५ मो.वा.का. सहकलम ३ महाराष्ट्र मालमत्ता विदृपीकरण अधीनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०९/०४/२०१८ चे १९.२० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही गांधी चौक भंडारा येथे दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहाल ॲनालायझर मिशन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. इक्बाल शेख यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०९/०४/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे तिरूपती गिफ्ट सेंटरचे समोरील गांधी चौक भंडारा येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याने, चालकास वाहन थांबविण्यास सांगितले असता चालक वाहन घेवुन पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. महालगावे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

**५) धानावर मारण्याची औषध प्राशन करून इसमाचा मृत्यु:—**

दिंनाक ०९/०४/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील मृतक महेश नामदेव पराते वय ३० वर्ष रा. वैजेश्वर वार्ड पवनी याने धानावर मारण्याची औषधी प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रामीण रूग्नालय पवनी येथे आणले असता, डॉक्टरनी तपासुन मृत पावल्याचे घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्हाके याची रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत

**६) अवैध दारु/जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक ०९/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन गोबरवाही येथे अवैध हातभट्टी दारू /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभंट्टी दारू किंमती ६००/—रु. तसेच जुगारातुन किमती १५०/—रु. असा एकुन किमती ७५०/रु.माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०९/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — १९ तीन सिटर वाहनाकरीता— ०६ ईतर वाहनांवरती — १०१ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.